
# मातृपंचक



संपादक- डॉ. स्नेहल तावरे
डॉ. वेदश्री थिगळे

# मातृपंचक

संपादक
डॉ. स्नेहल तावरे
डॉ. वेदश्री थिगळे

लीलावती प्रकाशन

लीलावती प्रकाशन

◈

**मातृपंचक**

◈

**प्रकाशक आणि मुद्रक**
**डॉ. लीला गोविलकर**
व्यंकटेश बंगला, प्रोफेसर कॉलनी,
सावेडी रोड, अहमदनगर
भ्रमणभाष : ९४२२०८३६०२
स्थिरभाष : ०२४१-२४२४८३७

◈

**मुखपृष्ठ :** क्रिएटिव्ह ग्राफिक्स

◈

**प्रथमावृत्ती :** १५ ऑगस्ट २०१३

◈

© कवितेचे हक्क कवींकडे

◈

**अक्षरजुळणी :** क्रिएटिव्ह ग्राफिक्स

◈

**मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटिंग प्रेस, पुणे

◈

**पृष्ठसंख्या :** ९२

◈

**ISBN 978-81-926415-4-6**

◈

**मूल्य :** ₹ ६०/-

# अनुक्रमणिका

प्रस्तावना - डॉ. स्नेहल तावरे
डॉ. वेदश्री थिगळे /७

**जन्मदात्री आई**

१. आई - कवी यशवंत / २७
२. माझी आई - नारायण सुर्वे / ३०
३. तुझ्या फक्त असण्यानंच - सुहासिनी इर्लेकर / ३२
४. आई - ना.धों.महानोर / ३३
५. माय - वामन निंबाळकर / ३६
६. माझी आई - फ.म. शहाजिंदे / ३८
७. आई - फ. मुं. शिंदे / ४०
८. आई - नामदेव ढसाळ / ४४
९. आईसाठी - अरुण काळे / ४७
१०. माझी गरीब माउली - उत्तम कांबळे / ५०

**काळी आई**

१. धरत्रीले दंडवत - बहिणाबाई चौधरी / ५३
२. गर्भ धरणीचा - आनंद यादव / ५५
३. वावर - विठ्ठल वाघ / ५७
४. माती झाली माय - इंद्रजित भालेराव / ५९
५. मायमाती - ऐश्वर्य पाटेकर / ६१

## मायमाती

- ऐश्वर्य पाटेकर

**परिचय - प्रा. ऐश्वर्य नामदेव पाटेकर** (१४ एप्रिल १९७७)

मातीवर प्रेम करणारा, गरीब शेतकरी कुटुंबातील अस्थिर आर्थिक परिस्थितीशी संघर्ष करीत कवितेचे चांदणे फुलविणारा कवी. 'भुईशास्त्र' या पहिल्याच कवितासंग्रहास साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त. याच कवितासंग्रहास यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, इंदिरा संत काव्य पुरस्कार, गदिमा पुरस्कार असे एकूण अकरा पुरस्कार मिळालेले आहेत. ओडिया, हिन्दी, बंगाली भाषांमध्ये त्यांच्या कवितांचे अनुवाद झालेले आहेत. सहाव्या आंतरराष्ट्रीय काव्यमहोत्सवानिमित्त साहित्य अकादमी आयोजित काव्यमहोत्सवात मराठी भाषेचा प्रतिनिधी म्हणून दोन वेळा निवड. सध्या कर्मवीर काकासाहेब वाघ संस्थेत मराठी विषयाचे अध्यापन.

मायमातीचा गा लळा
आईसारखीच आई
दोघीजणी एकजशा
काही फरकच नाही

मातीनंच आईला जगवलं
तिचं वाळू पाहणारं झाड मातीनंच जतवलं
म्हणूनच जित्याजिवंत हाडापेरांच्या माणसांपेक्षा
आईचा मातीवरचा विश्वास बहुभारी.
दुष्काळ पडल्यावर आई म्हणायची,
''माती इतकीही निर्दयी नायी;
ती तिच्या लेकीला मरू द्यायची नायी

लेकीची, लेकराबाळांची पाटी उन्हात अशी
तळू द्यायची नायी.''
चार तिच्या लेकी म्हणजे,
तिच्याच आतड्याच्या चार साळुंक्या
एकुलता लेक मिळून पाचुंद्याची जबाबदारी एकट्या आईवर
आईनं ती बिनदिक्कत मातीवर सोपवली
आमची नड भागवायची माती
अंधाऱ्या घरात उजळायच्या वाती...

आईनं तिचा मोडलेला संसार
मातीच्याच जोरावर उभा केला; जगवला
मातीनंच लिंपल्या दुःखाच्या भेगा
आईला हुर्द मोकळं करायला
मातीच होती हक्काची जागा...
आम्हास कुठं ठेचलं, खरचटलं
तर आई घ्यायची माती अन् चोळायची जखमेवर
माती मलमापेक्षाही भारी इलाज ठरायची
जखम खपली धरायची !

तान्हेल्या नकळत्या वयात
आमची दुखणी आईला कळायची,
तसंच मातीचंही दुखणं तिला थेट कळायचं
दुष्काळात भेगाडलेली माती पाहून
तिचं काळीज तिळतिळ तुटायचं...

''भेगाडल्या मायबाई,
कसं कसं शिवू तुला
कोण्या दुश्मनानं माझा
सुईदोरा चोरु नेला
''मायबाई मायबाई

त्याच मातीच्या चिखलानं भरलेले पाय
मी गोंदणासारखे जपले
गुलालासारखी मिरवली माती भाळावर

म्हणूनच कवितेच्या शोधाची सृजनशील पाटी
मातीनेच ठेवली माझ्या हाती

-तिच्यावरच गिरवतोय 'अ, आ, ई.'

( भुईशास्त्र )

शब्दार्थ :
पाचुंद्याची - पाच जणांची
हुर्द - हृदय

मानवी जीवनाला 'वात्सल्य, प्रेम, प्रेरणा, स्फूर्ती' देऊन अंधारातून प्रकाशवाटेवर आणणारा नितांत रमणीय शब्द म्हणजे 'आई'. माता, माय, माउली' अशा अनेक शब्दांतून विविध रूपात भेटणारा मातृभाव सदैव वंदनीय राहिला आहे आणि राहणार आहे.

जन्म देणारी जन्मदात्री, भरण-पोषण करणारी काळी आई, जीवन सुसह्य करणारी दैवतमाउली, व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी मातृभाषा, विश्वात्मक मातृभाव प्रदान करणारी मातृभूमी या सर्व रूपांच्या मातृमूल्यभावाचा परिचय 'मातृपंचक' हे पुस्तक करून देईल. विद्यार्थ्यांच्या जीवनातही हा मातृमूल्यभाव दृढ होईल आणि त्यांच्या जगण्याला एक अधिष्ठान प्राप्त होईल असा विश्वास वाटतो.

**डॉ. स्नेहल तावरे**

अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, पुणे विद्यापीठ,
मराठी संशोधन केंद्र आणि मराठी विभाग प्रमुख, मॉडर्न महाविद्यालय, पुणे

**• पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ – सदस्य •**

- **डॉ. विद्यागौरी टिळक**, मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ
- **डॉ. अशोक शिंदे**, मराठी विभाग प्रमुख, श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा, अहमदनगर
- **डॉ. अरुण कोळेकर**, मराठी विभाग प्रमुख, कला महाविद्यालय, जेजुरी, पुणे
- **डॉ. भास्कर शेळके**, मराठी विभाग प्रमुख, शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, पुणे
- **डॉ. उज्ज्वला देवरे**, प्राचार्य, कला महाविद्यालय, सौंदाणे, मालेगाव, नाशिक
- **डॉ. बाळासाहेब गुंजाळ**, मराठी विभाग प्रमुख, के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक
- **डॉ. वेदश्री थिगळे**, मराठी विभाग प्रमुख, कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय, सिडको, नाशिक
- **डॉ. शिरीष लांडगे पाटील**, मराठी विभाग, जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडे, ता. नेवासा, अहमदनगर
- **डॉ. अशोक देशमाने**, मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. सुनील देवधर**, कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी, पुणे केंद्र

**• उपसमिती सदस्य •**

- **डॉ. दिलीप धोंडगे**, प्राचार्य, के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक
- **डॉ. सिद्धार्थ आगळे**, मराठी विभाग प्रमुख, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

लीलावती प्रकाशन